आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ जानेवारी २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- ७६व्या प्रजासत्ताक दिनाचा आज सर्वत्र उत्साह/ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत ध्वजारोहण संपन्न

- परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि इतर सर्वच बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन

- मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तर वाहिनीचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**आणि**

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या विजेतपदासाठी आज गतविजेता यानिक सिनर आणि जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांची लढत

**<><><><><>**

७६वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र उत्साहाने देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येत आहे. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिरंगा ध्वज फडकावला. देशाच्या सामरिक सज्जतेचं, आणि सांस्कृतिक परंपरेचं समृद्ध दर्शन घडवणाऱ्या संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारली. देशाची विविधता आणि सांस्कृतिक एकात्मता दाखवणारे १६ विविध राज्यांचे तसंच इतर मंत्रालयांचे मिळून ३१ चित्ररथही संचलनात सहभागी झाले होते. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियंतो या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. **स्वर्णिम भारत विरासत और विकास** ही यंदाच्या संचलनाची संकल्पना होती.

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि इतर  सर्वच बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आज मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर आयोजित मुख्य शासकीय सोहळ्यात ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन सरकारी कामकाज अधिक गतिमान करता येईल, असं ते म्हणाले. लोककल्याणाच्या विविध योजना येत्या १०० दिवसात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत असं ते म्हणाले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर राज्य पोलीस दल आणि इतर सुरक्षा दलांच्या संचलनाची मानवंदना राज्यपालांनी स्वीकारली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दक्षिण ऑस्ट्रेलिया राज्याचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री जो झेकॅक्स, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथंही राष्ट्रध्वज फडकावून ध्वजाला मानवंदना दिली. विधान भवनात विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी तिरंगा फडकावला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी आणि कर्मचारीही यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या त्यांच्या शासकीय निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली. यावेळी पोलीस दलाच्या पथकानं राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज ठाण्यात झालेल्या ध्वजवंदनेच्या कार्यक्रमात उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यात ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम झाला.

मुंबई शहर आणि उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातही ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळवलेले खेळाडू आणि शिक्षकांचा सत्कार केला गेला. शहीद जवानांच्या वीर माता आणि कुटुंबीयही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पश्चिम रेल्वे मुख्यालयात पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक कुमार मिश्र यांनी राष्ट्रध्वज फडकवून मानवंदना दिली. यावेळी त्यांनी रेल्वे सुरक्षा दल, श्वान पथकाच्या संचलनाची मानवंदना स्वीकारली दिली. या कार्यक्रमाला पश्चिम रेल्वेचे अधिकारी, आणि परदेशी पाहुण्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. मध्य रेल्वेच्या मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीणा यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

प्रजासत्ताक दिना निमित्त आकाशवाणी मुंबई केंद्राच्या आवारातही केंद्राचे उपमहासंचालक संजय बोदेले यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

**<><><><><>**

**नवी मुंबईत** कळंबोली इथे पोलीस मुख्यालय मैदानावर प्रजासत्ताक दिनानिमित्त कोकण स्तरावरचं ध्वजारोहण संपन्न झालं. कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी तिरंगा फडकावला. या कार्यक्रमाला वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसह नागरिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी नवी मुंबई पोलीस पथकासह विविध पथकांनी संचलन करत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. प्रजासत्ताक दिनानिमित्त **रायगड** जिल्ह्यात अलिबाग इथे पोलीस मैदानावर महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**रत्नागिरी** जिल्ह्याचा मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ रत्नागिरी शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर संपन्न झाला. रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या यावेळी हस्ते ध्वजारोहण झालं.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात ओरोस इथं पोलीस कवायत मैदानावर प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण झालं. पोलिसांच्या तुकड्यांनी पथसंचलन केल्यानंतर राणे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**पालघर** इथे प्रजासत्ताक दिनानिमित्त कोळगाव पोलीस परेड मैदानावर पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

**कोल्हापूर** इथं पालकमंत्री, प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते तर **सातारा** इथं पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. **सोलापूर** येथील परेड मैदानावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. **अहिल्या नगर** इथल्या पोलिस मुख्यालय प्रांगणात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. **धाराशिव** इथं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

**हिंगोली** ,**परभणी, बीड** , **जालना**, **लातूर**, पालकमंत्र्याच्या हस्ते ध्वजारोहण झालं **जळगाव** , **धुळे बुलडाणा**, **अकोला**, **वाशीम**, **यवतमाळ, गडचिरोली**, **गोंदिया, भंडारा चंद्रपूर** पालकमंत्र्याच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

**<><><><><>**

किनारी रस्त्यामुळे मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ आणि इंधन यात मोठी बचत होणार असून प्रदूषण कमी करण्यात हा मार्ग महत्त्वाची भूमिका बजावेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. धर्मवीर स्वराज्यरक्षक

छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तर वाहिनीचं लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री आशीष शेलार, मंगल प्रभात लोढा, आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तरवाहिनी मार्गासह इतर तीन आंतरमार्गिका उद्यापासून वाहतुकीसाठी खुल्या होणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

<><><><><>

७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. संविधान तयार करून, देशाचा विकास लोकशाही, त्याची प्रतिष्ठा आणि एकतेवर आधारित असल्याचं सुनिश्चित करणाऱ्या सर्व महान व्यक्तिमत्त्वांना आदरांजली अर्पण करत असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानं देशाच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यंदा ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्म पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि सुप्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर पद्म विभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. सुप्रसिद्ध लेखक मारुती चितमपल्ली, अभिनेता अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांवर अल्प दरात उपचार करणारे डॉ. विलास डांगरे, गायिका अश्विनी भिडे, बासरी वादक रोणू मुजुमदार, चित्रकार वासुदेव कामत, पर्यावरण वादी कार्यकर्ते चैतराम पवार यांच्यासह माहेश्वरी हँडलुम साठी सॅली होळकर, ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या राधा

भट, कर्नाटकातले ज्येष्ठ गोंधळी गायक वेंकप्पा सुगतेकर यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. ज्येष्ठ अभिनेता अशोक सराफ यांनाही पद्मश्रीने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला....

**बाईट- अशोक सराफ**

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत आज पुरुष एकेरीचा अंतिम सामना अग्रमानांकित आणि गतविजेता यानिक सिनर आणि जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांच्यात होत आहे. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात काल अमेरिकेच्या मॅडिनस कीज हिनं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला धक्का देत अजिंक्यपद पटकावलं.

**<><><><><>**

आयसीसी १९ वर्षांखालच्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत आज क्वालालंपूर इथं झालेल्या सामन्यात भारतानं बांगलादेशावर ८ गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून बांग्लादेशाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. आणि उत्तम गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करत त्यांच्या फलंदाजीला लगाम घातला. बांग्लादेशानं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून ६४ धावा केल्या. भारतातर्फे वैष्णवी शर्मानं ३ बळी मिळवले. त्यानंतर ६५ धावांचं विजयी लक्ष्य भारतानं ७ षटकं आणि एका चेंडूत २ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. गोंगडी त्रिशानं ४० धावा केल्या.

**//<><><><><>//**